पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा ■ वर्ष १ ■ अंक १३ ■ रविवार, दि. ७ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# परिवहन मंत्र्यांना अकोल्यात अवैध वाहतुकीची सलामी

**राज्यात एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहनांना नो एन्ट्री, ५ ते १५ जूनदरम्यान राज्यव्यापी मोहीम**

प्रतिनिधी ७ जून

**मुंबई / अकोला :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नाला भगदाड पाडणाऱ्या आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात होणाऱ्या अवैध खासगी वाहतुकीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी ५ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात 'विशेष अंमलबजावणी मोहीम' राबवण्याचे आदेश परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. सोमवारी राज्याचे परिवहन मंत्री अकोल्यात येणार असून त्यांना अकोल्यात अवैध प्रवासी वाहतुकीची सलामी राहणार काय अशी विचारणा होत आहे. शहर वाहतुक शाखा व आर टी ओ यांचे तर दूर्लक्ष आहेच. पण, त्याच बरोबर राज्य परिवहन मंडळाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे देखील दूर्लक्ष अवैध प्रवासी वाहतुकीकडे असल्याची ओरड आहे. त्यामुळे सोमवारी अवैध प्रवासी वाहतुकीच्या विळख्यात



असलेले आगार क्रमांक १ व २ ची काय परिस्थिती राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अवैध वाहतुकीसंदर्भात दिलेल्या आदेशांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असून नियम मोडणाऱ्या वाहनांवर अत्यंत कठोर कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या मोहिमेच्या यशस्वितेसाठी एसटी महामंडळाने विशेष संयुक्त पथके तैनात केली आहेत. यात खालील अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग असेल. विभागीय वाहतूक अधिकारी आणि प्रादेशिक व्यवस्थापक, आगार व्यवस्थापक, वाहतूक व सहायक वाहतूक निरीक्षक, सुरक्षा आणि दक्षता विभागाचे अधिकारी व पर्यवेक्षक, या सर्व पथकांना केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून नियमित तपासण्या करण्याचे आणि केलेल्या कारवाईचा सविस्तर 'अनुपालन अहवाल' थेट मुख्यालयाला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.अवैध व खासगी गाड्यांमुळे बसस्थानक परिसरात होणारी गुन्हेगारी, महिला प्रवाशांची छेडछाड आणि एजंटांची दादागिरी मोडून काढणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. प्रवाशांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि दर्जेदार सेवा देणे हेच महामंडळाचे ध्येय आहे.

### अन्यथा, कडक कारवाई

एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने या संदर्भातील अधिकृत परिपत्रक



जारी केले आहे. 'एसटी ही महाराष्ट्राची जीवनवाहिनी आहे. एसटीच्या उत्पन्नावर डल्ला मारणारी आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा खेळखंडोबा करणारी अवैध वाहतूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. बसस्थानक परिसरातील गर्दी आणि वाहतूक कोंडी फोडण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कडक कारवाई होणार आहे.

- **प्रताप सरनाईक,** परिवहनमंत्री

## भागवत कथा ज्ञानयज्ञ निमित्त देवदर्शन



परमपूज्य स्व. श्री पुंडलिकराव बंकटराव देशमुख (अण्णासाहेब) यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ गोरक्षण रोडवर दत्त कॉलनीत 'श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी गोरक्षण संस्थान येथून कथा स्थळापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. आर आर सी नेटवर्कचे संस्थापक संचालक प्रदीप उपाख्य बंडूभाऊ देशमुख, सौ. कल्पनाताई देशमुख, कार्यकारी संचालक पंकज देशमुख, सौ. ऋतुजा देशमुख, पंडीत सुदर्शन शर्मा आणि कुटुंबीयांनी श्री बालाजी, भगवान श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. अतिशय भावपूर्ण वातावरणात शोभायात्रा कथा स्थानी पोहोचली.

# घरगुती गॅस 29 ने महागला

**♦ अकोल्यात ९६२ रुपयांचे झाले सिलेंडर**

वृत्तसंस्था ७ जून

**नवी दिल्ली :** घरगुती एलपीजी सिलिंडर २९ रुपयांनी महागला आहे. नवीन दर आज रात्री १२ वाजल्यापासून लागू झाले आहेत.

दिल्लीत आता १४.२ किलो वजनाच्या गॅस सिलिंडरची किंमत ९१३ वरून ९४२ होईल. पण, अकोल्यात मात्र त्या पेक्षा जास्त म्हणजे ९६२ रुपयांचे सिलेंडर होणार आहे. तीन महिन्यांत दुसऱ्यांदा एलपीजीच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. यापूर्वी ७ मार्च रोजी एलपीजी सिलिंडरचे दर ६० ने वाढवण्यात आले होते. अशा प्रकारे ३ महिन्यांच्या आत घरगुती सिलिंडर ८९ रुपयांनी महागला आहे. न्यूज एजन्सी पीटीआयच्या सूत्रांनुसार, तेल कंपन्यांचे म्हणणे



आहे की, आंतरराष्ट्रीय बाजारात वाढलेल्या ऊर्जा खर्चामुळे आणि घरगुती विक्रीवरील नुकसानीमुळे किमती वाढवाव्या लागल्या आहेत.न्यूज एजन्सी पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, सरकारी तेल कंपन्यांना प्रत्येक घरगुती सिलिंडरवर सुमारे ७०३ चे नुकसान होत होते. किंमती वाढूनही केवळ अंशतः भरपाई होईल. २०२६ पूर्वी सरकारने ८ एप्रिल २०२५ रोजी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ५० ची वाढ केली होती. १ मार्च २०२६ रोजी व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर ३१ पर्यंत वाढवण्यात आले होते. ५ किलोग्राम वजनाच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही ११ ची वाढ करण्यात आली होती, ज्यामुळे त्याची किंमत ८२१.५० झाली. गेल्या काही आठवड्यांत पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीचे दरही वाढले आहेत. मे महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती एकूण ७.५० प्रति लिटरने वाढल्या आहेत, तर सीएनजी सुमारे ६ प्रति किलोने महाग झाली आहे. कंपन्यांना पेट्रोलवर सुमारे ११ प्रति लिटर आणि डिझेलवर ३३.६ प्रति लिटरचे नुकसान होत आहे.

# शरद पवारांचा मोदींवर घणाघात

प्रतिनिधी ७ जून

**पुणे :** देशभरात दैनंदिन वापरातील आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आधीच गगनाला भिडलेल्या असताना, केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला महागाईचा आणखी एक तीव्र झटका दिला आहे. घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात थेट २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांच्या किचनचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे. केंद्राच्या या धोरणावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी कडाडून टीका केली असून, सत्ताधाऱ्यांना याची राजकीय किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला आहे.या दरवाढीवर आपली पहिली प्रतिक्रिया देताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक धोरणांवर निशाणा साधला. ते म्हणाले, 'हे असंच चालणार, हे दर सातत्याने वाढवले जात आहेत. या वाढत्या महागाईचा थेट परिणाम आज सामान्य माणसाच्या संसारावर होत आहे. पंतप्रधानांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित करत असल्याचे सांगितले होते. पण, 'नियंत्रित' करणे याचा अर्थ जनतेला टप्प्याटप्प्याने महागाईचे धक्के देणे, हेच त्यांचे सूत्र बनले आहे. या निर्णयांची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी नक्कीच कळेल.'

# राज्यसभेच्या जागेसाठी राष्ट्रवादीत पेच

प्रतिनिधी ७ जून

**मुंबई :** राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे एकाला राज्यसभेवर जाण्याची संधी आहे. या जागेवर अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दावा केला आहे. तर दुसरीकडे माजी खासदार नवनीत राणा यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली आहे. यामुळे आता राज्यसभेसाठीच्या जागेवर राणांना संधी मिळणार अशी चर्चा सुरू झाली आहे.रविवारी सकाळी नवनीत राणा यांनी अचानक मुंबईत येऊन 'देवगिरी' बंगल्यावर थेट सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. नवनीत राणा आणि सुनेत्रा पवार यांच्यात बंद दाराआड नेमकी काय चर्चा झाली, याचा तपशील अद्याप समोर आलेला नाही. दरम्यान छगन भुजबळ यांनी खासदारकीसोबत दोन अटी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांपुढे घातल्या आहेत. छगन भुजबळ यांची प्रतिमा महाराष्ट्रातील ओबीसींचे नेते अशी झाली आहे. राज्यसभेत जाऊन ही प्रतिमा त्यांना राष्ट्रीय पातळीवर नेण्याची तीव्र इच्छा आहे. नवनीत राणांनी भाजपसोबतच राहणार अशी भूमिका घेतल्याने त्यांना संधी मिळणार की नाही या विषयी दूमत आहे.




# भाजपविरोधात दंड थोपाटण्याची तयारी अर्धवट ?

**♦ अकोल्यातील नेत्यांवर शिवसेना नेतृत्वाचा अविश्वास !**

प्रतिनिधी ७ जून

**अकोला :** राज्यात आगामी निवडणुकांचे बिगुल वाजण्यापूर्वीच अकोला जिल्हा शिवसेनेतील अंतर्गत वाद आणि स्थानिक नेत्यांवरील अविश्वास चव्हाट्यावर आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'लढवय्या वृत्ती' आणि आक्रमक राजकीय शैलीला अकोल्यातच स्थानिक पातळीवर आडकाठी निर्माण होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळेच की काय, भाजपविरोधात पूर्ण ताकदीने दंड थोपाटण्याची शिवसेनेची अकोल्यातील तयारी आता अर्धवट तर राहणार नाही ना ? अशी शंका उपस्थित केली जात आहे. प्रदेश पदाधिकाऱ्यांना सर्वच तयारी करावी लागत असेल तर स्थानिक नेतृत्व काय कामाचे असा प्रश्न विचारला जात आहे. अकोल्यातील शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांवर प्रदेशाचे वरिष्ठ नेते विश्वास ठेवण्यास तयार नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जिल्हा पातळीवरील संघटनात्मक कमकुवतपणा आणि स्थानिक पातळीवरील समन्वय साधण्यात आलेले अपयश, यामुळेच वरिष्ठ नेतृत्वाने अकोल्यातील सूत्रे थेट मुंबई-ठाण्यातील विश्वासू नेत्यांकडे सोपवल्याचे बोलले जात आहे. इतकेच काय तर अकोल्यातील कुठल्याही कार्यक्रमाच्या तयारीची साधी जबाबदारी देखील स्थानिक नेत्यांवर दिली जात नसल्याची चर्चा आहे. स्थानिक नेत्यांमधील अंतर्गत गटबाजी आणि अविश्वासामुळे या अत्यंत महत्त्वाच्या जिल्हा पदाधिकारी व एस.आय.आर.मार्गदर्शन शिबिराच्या नियोजनाची धुरा स्थानिकांच्या हाती नसल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. अकोल्याचे संपर्कमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक हे स्वतः अकोल्यात ठाण मांडून पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना आगामी रणनीतीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. सोमवार, ०८ जून सकाळी १०:३० वाजता गोरक्षण रोडवरील शुभमंगल मंगल कार्यालय पदाधिकारी मेळावा होणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून शिवसेनेने अकोल्यात आपली ताकद दाखवण्याची तयारी केली असून, राज्यातील अनेक दिग्गज नेते यावेळी उपस्थित राहणार आहेत. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आ. बच्चूभाऊ कडू यांचा सत्कार या मेळाव्यात होईल. तर कार्यक्रमाला डॉ. राजन साळवी यांची उपस्थिती राहणार आहे. या मार्गदर्शन शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रमुख, युवासेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र येणार आहे. प्रताप सरनाईक यांचे हे मार्गदर्शन अकोल्यातील शिवसेनेची भाजपविरोधातील लढाई मजबूत करणार की स्थानिक नेत्यांमधील अंतर्गत वाद आणखी वाढवणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विशेष वृत्त जागतिक वारसा असलेल्या लोणार सरोवराच्या शाश्वत विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गतीमान

**४३४ कोटींच्या विकास आराखड्याला वेग देत तीन महिन्यात मागवला 'ॲक्शन टेकन रिपोर्ट'**

**बुलढाणा :** जागतिक पातळीवरील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक आश्चर्य, विवर क्षेत्र आणि आंतरराष्ट्रीय रामसार स्थळ असलेल्या लोणार सरोवराचे संवर्धन, जतन आणि ऐतिहासिक वैभव जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गतीमान पावले उचलली आहेत. पर्यटन आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून जागतिक नकाशावर असलेल्या या अमूल्य वारशाचे शास्त्रोक्त पद्धतीने जतन व्हावे, यासाठी मुख्यमंत्री स्तरावर विशेष लक्ष दिले जात असून, प्रशासकीय प्रक्रियांना कमालीची गती देण्यात आली आहे. लोणार सरोवर जतन, संवर्धन आणि विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या सर्व कामांचा आणि आगामी काळातील नियोजित प्रक्रियेचा सविस्तर 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' (Action Taken Report) पुढील ३ महिन्यांत थेट मुख्यमंत्री कार्यालयाला सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांना दिले आहेत, जेणेकरून या जागतिक वारशाचा विकास अत्यंत दर्जेदार पद्धतीने आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण होईल.

केंद्रीय वन, पर्यावरण आणि पर्यटन मंत्रालयाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेत लोणार सरोवराच्या पुनरुज्जीवनासाठी यापूर्वी केंद्रीय



मंत्री नितीन गडकरी यांनी भारत सरकार स्तरावर महत्त्वपूर्ण पाठपुरावा केला आहे. हाच वारसा पुढे नेत आता राज्य सरकारच्या वतीने केंद्र सरकारकडे सादर करावयाचा सविस्तर आणि सर्वसमावेशक आराखडा (मास्टर प्लॅन) अधिक परिपूर्ण व मजबूत केला जात आहे. केंद्र सरकारकडे रीतसर प्रस्तावांचा वेगाने पाठपुरावा करून सर्व प्रलंबित प्रक्रियांना गती दिली जात असून, या सर्व नियोजित कामांसाठी एक निश्चित कालमर्यादा (Timeline) आणि प्रशासकीय उत्तरदायित्व निश्चित करून प्रत्यक्ष कृती तातडीने सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. लोणार सरोवराच्या पाण्याच्या पातळीत मागील काही काळापासून निसर्गचक्र आणि अंतर्गत जलस्त्रोतांमुळे लक्षणीय वाढ झाली आहे. सरोवराचे पाणी सरासरी २० मीटर आतपर्यंत शिरले असून, जलपातळी उन्हाळ्याच्या तुलनेने ३ ते ४ मीटरने वाढल्यामुळे काठावरील काही प्राचीन मंदिरे आणि नैसर्गिक वनसंपदा पाण्याखाली गेली आहे. या परिस्थितीचा सखोल अभ्यास करण्यासाठी आणि येथील प्राचीन मंदिरांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासन अत्यंत वैज्ञानिक आणि तांत्रिक दृष्टिकोनातून काम करत आहे. प्रत्यक्ष पाहणी दरम्यान गोमुख धार, पापारेश्वर मंदिर परिसर आणि सीतान्हाी येथील नैसर्गिक झऱ्यांमधून मिळून साधारणतः २४ हजार ५४० लीटर प्रति तास एवढा प्रचंड पाण्याचा प्रवाह विवर क्षेत्रात येत असल्याचे ९० डिग्री व्ह्-नॉच मोजमापाद्वारे सिद्ध झाले आहे. या गोड पाण्याचा ज्प ७.०० च्या आसपास असून, सरोवराच्या मुख्य पाण्याचा ज्प १०.०० ते ११.०० च्या दरम्यान असल्याने या पाण्याच्या पातळीतील वाढीचा शाश्वत अभ्यास केला जात आहे. उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली यासाठी एक विशेष तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली आहे. या अंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे (GSDA) तज्ज्ञ भूवैज्ञानिक मे २०२६ ते सप्टेंबर २०२७ या कालावधीत संपूर्ण एक हायड्रोलॉजिकल सायकलचा सविस्तर अभ्यास करणार आहेत.

# फिटनेस प्लेटू : वजन कमी होणे, स्नायू वाढ, चरबी कमी होणे आणि ताकद वाढ अचानक का थांबते?

आजकाल जिममध्ये जाणारे, योग्य आहार पाळणारे किंवा आपल्या शरीरात सकारात्मक बदल घडवण्यासाठी नियमित प्रयत्न करणारे अनेक लोक दिसतात. मग ते वजन कमी करणे असो, चरबी कमी करणे, स्नायू वाढवणे किंवा ताकद वाढवणे -प्रत्येकाचे फिटनेस ध्येय वेगळे असू शकते.

फिटनेस प्रवासाच्या सुरुवातीला बहुतांश लोकांना चांगले परिणाम दिसून येतात. वजन कमी होऊ लागते, शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होते, स्नायू वाढू लागतात आणि ताकदीतही सुधारणा दिसते. मात्र, काही काळानंतर ही प्रगती अचानक मंदावते किंवा पूर्णपणे थांबल्यासारखी वाटू लागते. याच अवस्थेला 'फिटनेस प्लेटू' असे म्हटले जाते. फिटनेस प्लेटू आल्यावर अनेकांना आपली प्रगती पूर्णपणे थांबली आहे असे वाटू लागते. अपेक्षित परिणाम दिसेनासे झाल्यामुळे काही लोक निराश होतात, त्यांची प्रेरणा कमी होते आणि अनेक वेळा ते आपल्या फिटनेस प्रवासालाच ब्रेक लावतात. मात्र, हीच सर्वात मोठी चूक ठरू शकते. कारण प्लेटू म्हणजे तुमची प्रगती संपली असे नाही, तर शरीर नवीन परिस्थितीशी जुळवून घेत आहे याचा तो संकेत असतो. योग्य बदल आणि सातत्य ठेवल्यास पुन्हा प्रगती सुरू होऊ शकते.

### फिटनेस प्लेटू येण्याची कारणे कोणती?

**१) शरीराची सवय होणे :** आपले शरीर अत्यंत बुद्धिमान असते. जर आपण दीर्घकाळ एकाच प्रकारचा व्यायाम, समान तीव्रतेने आणि एकाच पद्धतीने करत असू, तर शरीर त्या गोष्टींशी जुळवून घेते. त्यामुळे सुरुवातीला मिळणारे परिणाम हळूहळू कमी होऊ लागतात.

**२) आहारामध्ये योग्य बदल नसणे :** चरबी कमी करणे, स्नायू वाढवणे किंवा ताकद वाढवण्यासाठी आहार खूप महत्त्वाचा असतो. अनेक वेळा लोक व्यायाम नियमित करतात, पण उष्मांक (कॅलरी), प्रथिने आणि इतर पोषकतत्त्वांकडे पुरेसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे प्रगती मंदावू शकते.

**३) अपुरी झोप आणि शरीराची पुनर्बांधणी :** शरीरातील बदल फक्त जिममध्ये होत नाहीत. व्यायामानंतर शरीर स्वतःची दुरुस्ती करून अधिक मजबूत बनण्याचे काम विश्रांतीच्या काळात करत असते. अपुरी झोप, जास्त ताणतणाव किंवा योग्य विश्रांतीचा अभाव असल्यास प्लेटू येऊ शकतो.

**४) व्यायामामध्ये प्रगतीशील वाढ नसणे :** जर व्यायामामध्ये हळूहळू वजन, पुनरावृत्ती (रेप्स), तीव्रता किंवा आव्हान वाढवले गेले नाही, तर शरीराला नवीन उद्दीपन मिळत नाही. यामुळे स्नायू वाढ आणि ताकदीतील प्रगती थांबू शकते.

**५) अवास्तव अपेक्षा :** फिटनेसच्या सुरुवातीच्या काळात परिणाम जलद दिसतात. मात्र, काही काळानंतर प्रगती मंद होणे ही सामान्य प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक मंद प्रगतीला प्लेटू समजणे योग्य नाही.

### फिटनेस प्लेटू कसा दूर करावा?

**१) व्यायामामध्ये बदल करा :** व्यायामाचे प्रकार, तीव्रता, पुनरावृत्ती, संच (सेट्स) किंवा प्रशिक्षण पद्धतीमध्ये छोटे बदल करा. शरीराला नवीन आव्हान मिळाल्यास प्रगती पुन्हा सुरू होऊ शकते.

**२) आहार पुन्हा तपासा :** तुमच्या ध्येयानुसार उष्मांक, प्रथिने आणि इतर पोषकतत्त्वे योग्य प्रमाणात घेत आहात का हे तपासा. काही वेळा लहान आहारातील बदल देखील मोठा फरक निर्माण करू शकतात.

**३) विश्रांतीला प्राधान्य द्या :** पुरेशी झोप, योग्य प्रमाणात पाणी पिणे, ताणतणाव नियंत्रण आणि आवश्यक विश्रांती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अति व्यायाम टाळा.

**४) प्रगती योग्य पद्धतीने मोजा :** फक्त वजनाकडे पाहू नका. शरीराचे माप, ताकद, सहनशक्ती, ऊर्जा पातळी आणि शरीररचनेतील बदल यांचाही विचार करा.

**५) सातत्य आणि संयम ठेवा :** फिटनेस प्लेटू हा फिटनेस प्रवासाचा एक सामान्य भाग आहे. योग्य नियोजन, सातत्य आणि संयम ठेवल्यास प्रगती पुन्हा सुरू होते.

जर तुमची प्रगती काही काळासाठी थांबली असेल तर निराश होऊ नका. कदाचित तुमची प्रगती संपलेली नसते फक्त तुमच्या शरीराला पुढच्या स्तरावर जाण्यासाठी नवीन बदलांची गरज असते. त्यामुळे फिटनेस प्लेटूला शेवट समजू नका; तो पुढील प्रगतीचा संकेतही असू शकतो.



गणेश अंभोरे
द फिटनेस हब
फिटनेस प्रोफेशनल
अँड न्यूट्रिशनिस्ट

# हुंडा ही प्रथा....की समाजाला पोखरणारा कलंक




लग्न ही भारतीय संस्कृतीतील एक पवित्र आणि आनंदाची परंपरा मानली जाते. दोन व्यक्तींसोबत दोन कुटुंबे एकत्र येण्याचा हा सोहळा असतो. मात्र, काळाच्या ओघात या पवित्र नात्यावर 'हुंडा' नावाचा सामाजिक कलंक चिकटला आणि अनेक कुटुंबांच्या आयुष्यात दुःख, अन्याय आणि मानसिक छळाचे कारण बनला. शिक्षण, आधुनिकता आणि कायदे असूनही आजही समाजातील अनेक भागांमध्ये हुंड्याची प्रथा उघडपणे किंवा अप्रत्यक्षपणे सुरू असल्याचे वास्तव आहे.

' हुंडा घेणाऱ्या समाजाला आरसा दाखवण्याची वेळ आली आहे.' लग्नात मिळालेल्या वस्तूंवर 'हुंड्यात आलेली कार', 'हुंड्यात आलेला टीव्ही', 'हुंड्यात आलेला सोफा' अशा प्रकारच्या पाट्या लावल्यास समाजात काय संदेश जाईल, या संकल्पनेमुळे हुंडा घेण्याची मानसिकता किती लाजिरवाणी आहे, हे स्पष्टपणे समोर येते.

आज अनेक ठिकाणी हुंडा हा प्रतिष्ठेचा विषय बनला आहे. मुलगा उच्चशिक्षित असेल, नोकरीत असेल किंवा परदेशात राहत असेल तर त्याच्या बदल्यात मोठ्या प्रमाणात पैसे, दागिने, वाहन किंवा महागड्या वस्तूंची मागणी केली जाते. अनेक कुटुंबे समाजातील प्रतिष्ठा टिकवण्यासाठी कर्ज काढूनही हुंडा देतात. परिणामी मुलीच्या कुटुंबावर आर्थिक ओझे वाढते आणि अनेक वेळा मानसिक ताणतणाव निर्माण होतात.

हुंड्यामुळे महिलांवर होणारे अत्याचार, छळ, आत्महत्या आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना आजही समोर येत आहेत. सरकारने हुंडाबंदी कायदा लागू केला असला तरी सामाजिक मानसिकता बदलल्याशिवाय ही प्रथा पूर्णपणे बंद होणे कठीण आहे. यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर समाजातील प्रत्येकाने स्वतःहून बदल स्वीकारणे गरजेचे आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओने अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण केला आहे की, जर हुंडा घेणे चुकीचे नाही, तर त्या वस्तूंवर 'हुंड्यात आलेले' असे लिहिण्यास लाज का वाटते? याच विचारातून समाजाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

हुंडा ही परंपरा नसून समाजाला लागलेला कलंक आहे. मुलगी ही ओझे नसून कुटुंबाचा अभिमान आहे, ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत होईल. हुंडामुक्त समाज निर्माण करण्यासाठी युवक-युवती, पालक आणि समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.



नेहा पाटील
अँकर रिपोर्टर,
आरआरसी न्यूज अकोला.

# व्यसनमुक्त समाज : काळाची गरज आणि प्रत्येकाची जबाबदारी

*'व्यसन' हा शब्द ऐकताच आपल्या डोळ्यांसमोर दारू, गुटखा, तंबाखू, सिगारेट आणि इतर घातक पदार्थांचे चित्र उभे राहते. आजच्या समाजात व्यसनाचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. गावोगावी, शहरोशहरी सहज उपलब्ध होणारी दारू, गुटखा आणि तंबाखू अनेकांच्या आयुष्याचा विनाश करत आहेत. सर्वात दुःखद बाब म्हणजे अल्पवयीन मुलेसुद्धा या विळख्यात अडकताना दिसत आहेत. ही केवळ एका व्यक्तीची समस्या नसून संपूर्ण समाजाला पोखरणारी एक गंभीर सामाजिक समस्या आहे. व्यसन करणारा माणूस सुरुवातीला स्वतःच्या आनंदासाठी किंवा मित्रांच्या प्रभावामुळे या मार्गावर जातो. परंतु काही काळानंतर तो त्या व्यसनाचा गुलाम बनतो. त्याचे आरोग्य खालावते, विचारशक्ती कमी होते आणि निर्णयक्षमता नष्ट होते. दारू, गुटखा किंवा इतर कोणतेही व्यसन शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम करते. कर्करोग, यकृताचे विकार, हृदयरोग आणि मानसिक आजार यांसारख्या अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. परंतु व्यसनाचा परिणाम फक्त त्या व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. त्याचा सर्वात मोठा फटका त्याच्या कुटुंबाला बसतो. एका व्यसनी व्यक्तीची पत्नी सतत भीती आणि चिंतेमध्ये जगत असते. पती घरी आल्यानंतर तो कसा वागेल, भांडण करेल का, हिंसाचार करेल का, घरातील वस्तूंची तोडफोड करेल का याची तिला सतत चिंता असते. मुलांवर त्याचा मानसिक परिणाम होतो.*

अनेक वेळा मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. वृद्ध आई-वडिलांना दुःख सहन करावे लागते. घरातील आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत जाते. अशा वेळी संपूर्ण कुटुंब संकटात सापडते. व्यसनामुळे समाजात गुन्हेगारी वाढते, अपघात वाढतात आणि कौटुंबिक हिंसाचाराला खतपाणी मिळते. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात. समाजात त्या कुटुंबाकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. प्रत्यक्षात दोष कुटुंबातील इतर सदस्यांचा नसतो, तर व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचा असतो. त्यामुळे व्यसन ही केवळ वैयक्तिक बाब नसून सामाजिक आणि राष्ट्रीय समस्या आहे.

आज सरकार व्यसनमुक्ती केंद्रे सुरू करत आहे, जनजागृती मोहीमा राबवत आहे. हे स्वागतार्ह आहे. परंतु दुसरीकडे दारू आणि तंबाखू उद्योगातून मिळणारा महसूल हा देखील वास्तवाचा भाग आहे. त्यामुळे समाजामध्ये अनेक प्रश्न उपस्थित होतात. सरकार, प्रशासन आणि पोलीस यंत्रणांनी महसुलापेक्षा जनतेच्या आरोग्याला अधिक महत्त्व दिले पाहिजे. अवैध विक्री, अल्पवयीन मुलांना होणारी विक्री आणि नियमभंग यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. पोलीस प्रशासनाची जबाबदारी केवळ कायदा अंमलात आणण्यापुरती मर्यादित नसून समाजाचे संरक्षण करणेही आहे. जे अधिकारी आणि कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावतात ते समाजाचे खरे रक्षक आहेत. परंतु भ्रष्टाचारामुळे जर अशा घातक व्यवसायांना संरक्षण मिळाले तर त्याचे दुष्परिणाम हजारो कुटुंबांना भोगावे लागतात. म्हणून प्रत्येक अधिकाऱ्याने आणि लोकप्रतिनिधीने आपल्या पदाचा उपयोग समाजहितासाठी केला पाहिजे.

भारतीय संस्कृती आपल्याला सत्य, न्याय आणि कर्तव्य यांची शिकवण देते. महाभारतात भगवान श्रीकृष्णांनी धर्म, न्याय आणि सत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. इतिहास साक्षी आहे की अन्याय, लोभ आणि चुकीच्या मार्गाने चालणाऱ्या शक्तींचा शेवटी पराभवच झाला आहे. त्यामुळे कोणतेही पद, पैसा किंवा सत्ता कायमची नसते; परंतु चांगली कर्मे आणि समाजासाठी केलेले कार्य कायम स्मरणात राहते. आज प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात करणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांवर चांगले संस्कार करावेत, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम समजावून सांगावेत, समाजाने व्यसनमुक्तीच्या चळवळींना पाठिंबा द्यावा आणि प्रशासनाने कठोर अंमलबजावणी करावी. एकत्रित प्रयत्नांतूनच व्यसनमुक्त समाज निर्माण होऊ शकतो.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की व्यसनामुळे मिळणारा क्षणिक आनंद हा आयुष्यभराच्या दुःखाचे कारण ठरू शकतो. म्हणून स्वतःसाठी, आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्रासाठी व्यसनाचा त्याग करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या खांद्यावरील जबाबदारी ओळखून निरोगी, सुसंस्कृत आणि व्यसनमुक्त भारत घडविण्यासाठी योगदान दिले पाहिजे. कारण शेवटी विजय हा सत्याचा, न्यायाचा आणि सदाचाराचाच होत असतो.

**देशी दारू आणि तरुणांचे भविष्य : शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज**

देशातील तरुण पिढी ही राष्ट्राची खरी ताकद आहे. मात्र देशी दारूच्या वाढत्या सेवनामुळे अनेक तरुणांचे आरोग्य धोक्यात येत आहे आणि अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे शासनाने या प्रश्नाकडे केवळ महसूल मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

एकीकडे सरकार निरोगी भारत, व्यसनमुक्त समाज आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देते, तर दुसरीकडे दारू विक्रीतून मोठ्या प्रमाणावर महसूल गोळा केला जातो. या विरोधाभासामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण होतात. विशेषतः देशी दारूमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर सर्वाधिक परिणाम होतो. व्यसनामुळे आर्थिक नुकसान, कौटुंबिक कलह, आरोग्याच्या समस्या आणि अपघातांचे प्रमाण वाढते. दारूच्या व्यसनामुळे अनेक तरुण आपले शिक्षण, रोजगार आणि भविष्य गमावतात. काही प्रकरणांमध्ये निकृष्ट किंवा बेकायदेशीर दारूमुळे मृत्यूदेखील होतात. त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात अनेक कुटुंबांना दुःखाचा सामना करावा लागतो. हा केवळ वैयक्तिक प्रश्न नसून सामाजिक आणि राष्ट्रीय चिंतेचा विषय आहे.

शासनाकडे कायदे करण्याची आणि समाजहितासाठी आवश्यक निर्णय घेण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे दारूविषयक धोरणांचा पुनर्विचार करणे, व्यसनमुक्ती केंद्रे वाढवणे, जनजागृती मोहीमा राबवणे आणि विशेषतः देशी दारूवरील नियंत्रण अधिक कठोर करणे आवश्यक आहे. केवळ महसूल वाढविण्यापेक्षा नागरिकांचे आरोग्य आणि तरुणांचे भविष्य अधिक महत्त्वाचे आहे.

देशाच्या प्रगतीसाठी तरुण पिढी सक्षम, निरोगी आणि व्यसनमुक्त असणे गरजेचे आहे. म्हणूनच शासनाने दारूच्या प्रश्नावर गंभीरपणे विचार करून समाजहिताला प्राधान्य द्यावे. अन्यथा अनेक कुटुंबांमध्ये दुःख, गरिबी आणि असुरक्षिततेचे वातावरण कायम राहील. राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

### संतांचा आदर्श आणि त्यांचे मार्गदर्शन

आपल्या भारतभूमीला अनेक महान संतांचा वारसा लाभला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस आणि रमण महर्षी यांसारख्या असंख्य संतांनी मानवाला सत्य, प्रेम, सेवा आणि संयम यांचा मार्ग दाखवला. त्यांनी व्यसनांपासून दूर राहून आत्मविकास आणि समाजसेवा करण्याचे महत्त्व सांगितले. परंतु दुर्दैवाने आज अनेकजण त्यांच्या शिकवणीचा विसर पडल्यासारखे वागत आहेत.

### चांगल्या मार्गावर चालताना संयम आवश्यक

कोणतेही मोठे यश एका दिवसात मिळत नाही. एखादा विद्यार्थी शिक्षण पूर्ण करण्यासाठी पंधरा-सोळा वर्षे सातत्याने अभ्यास करतो, त्यानंतरच त्याला यश मिळते. त्याचप्रमाणे चांगले विचार, चांगल्या सवयी आणि आदर्श जीवनशैली अंगीकारण्यासाठीही सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. सुरुवातीला लोक टीका करतील, टिंगल करतील, निंदा करतील; पण त्याकडे दुर्लक्ष करून योग्य मार्गावर चालत राहणे महत्त्वाचे आहे. काळाच्या ओघात तेच लोक आपल्या कार्याचा सन्मान करतात.

### समाज परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून

आपला गाव, परिवार, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश सुधारायचा असेल तर सुरुवात स्वतःपासून करावी लागेल. आपण चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या आणि चुकीच्या गोष्टींचा विरोध केला तर समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. एक चांगला नागरिक संपूर्ण समाजाला प्रेरणा देऊ शकतो. भारतातील प्रत्येक व्यक्तीने सदाचाराचा मार्ग स्वीकारला तर संपूर्ण जगासाठी भारत एक आदर्श ठरू शकतो. लहान मुलांसाठी आदर्श निर्माण करूया लहान मुले आणि मुली मोठ्यांचे अनुकरण करतात. जेव्हा ते एखाद्या व्यक्तीला व्यसन करताना पाहतात, तेव्हा त्यांच्या मनात भीती, संभ्रम आणि चुकीचे आकर्षण निर्माण होऊ शकते. म्हणूनच प्रत्येक प्रौढ व्यक्तीने स्वतःचे वर्तन आदर्श ठेवणे आवश्यक आहे. मुलांना आनंदाने, निरोगी वातावरणात आणि चांगल्या संस्कारांमध्ये वाढू देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

**निष्कर्ष :** व्यसनमुक्त जीवन हेच खरे सुखी आणि यशस्वी जीवन आहे. संतांच्या शिकवणीप्रमाणे सत्य, सदाचार, परिश्रम आणि समाजसेवा यांचा मार्ग स्वीकारल्यास आपल्या जीवनात आनंद निर्माण होईल आणि आपल्या माध्यमातून इतरांच्याही जीवनात प्रकाश पसरू शकेल. म्हणून आपण सर्वांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करूया, चांगल्या विचारांचा स्वीकार करूया आणि एक सुसंस्कृत, निरोगी व आदर्श समाज घडवण्यासाठी योगदान देऊया. हाच खरा ईश्वरसेवेचा मार्ग आहे आणि हाच मानवतेचा विजय आहे.

'व्यसनाला नकार द्या, संस्कारांना स्वीकारा; स्वतः आनंदी जगा आणि इतरांनाही आनंदाने जगू द्या.'

निवृत्ती तायडे
हिवरखेड. ता. तेल्हारा जि .अकोला
मो.७७०९५१७०१९

## दिन विशेष

# जागतिक अन्न सुरक्षा दिन



जागतिक अन्न सुरक्षा दिन दरवर्षी ७ जून रोजी साजरा केला जातो. सुरक्षित, पौष्टिक आणि दर्जेदार अन्नाचे महत्त्व पटवून देणे आणि दूषित अन्नामुळे होणाऱ्या आजारांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे.या दिनाविषयी काही महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे:इतिहास: संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या पुढाकाराने डिसेंबर २०१८ मध्ये हा दिवस अधिकृतपणे घोषित करण्यात आला.

शेतापासून ते ताटापर्यंत अन्न सुरक्षित राहावे आणि अन्नजन्य आजारांचे जागतिक प्रमाण कमी व्हावे यासाठी सरकार, उत्पादक आणि ग्राहक सर्वांनी मिळून कार्य करणे हा याचा मुख्य हेतू आहे.अन्न सुरक्षेसाठी महत्त्वाची काळजी:स्वच्छता: अन्न शिजवण्यापूर्वी आणि खाण्यापूर्वी हात स्वच्छ साबणाने धुवावेत.साठवणूक: अन्न नेहमी झाकून व योग्य तापमानावर (उदा. फ्रिजमध्ये) साठवावे.कच्चे व शिजवलेले अन्न वेगळे ठेवा: कच्चे मांस, भाजी आणि शिजवलेले अन्न एकत्र ठेवू नये.अधिकृत मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुरक्षित अन्नाचे नियम समजून घेण्यासाठी तुम्ही जागतिक आरोग्य संघटना किंवा अन्न आणि औषध प्रशासन यांच्या अधिकृत संकेतस्थळांना भेट देऊ शकता. अन्न सुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी विशेष मोहीम किंवा उपक्रम राबवले जातात. अन्न साठवणुकीच्या पद्धतींविषयी माहिती दिली जाते. बुडापेस्ट, हंगेरी येथे फळ आणि भाजीपाला शेतकरी बाजार भरतो. दरवर्षी अन्नजन्य आजारांच्या अंदाजे ६०० दशलक्ष प्रकरणे समोर येतात. असुरक्षित अन्न आरोग्यासाठी अपायकारक ठरते त्यामुळे या विषयी अन्न व औषधी प्रशासनाकडून जागृती तसेच नियम भंग करणाऱ्यावर कारवाई केली जाते. विशेष करून पावसाळ्यात उघडे अन्न खाणे अतिशय घातक असते. तसेच प्रकृती साठी ताजे सकस अन्न तसेच हंगामात उपलब्ध फळे खाणे नेहमी चांगले राहते. डॉक्टर देखील तसा सल्ला देतात.

# प्रशासकीय घोळात अडकले गरिबांचे राशन

## ७०० कुटुंब धान्यापासून वंचित



प्रतिनिधी ७ जून

**अडगांव बु. :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आगामी खरेदी हंगाम, अन्नधान्य साठवणूक आणि वाहतुकीच्या संभाव्य समस्यांचा विचार करून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत एक मोठा निर्णय घेण्यात आला होता. माहे एप्रिल, मे आणि जून २०२६ या तीन महिन्यांचे धान्य एकत्रित आणि आगाऊ देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. मात्र, या चांगल्या योजनेला पुरवठा विभागाच्या ढिसाळ नियोजना अभावी स्थानिक शेकडो स्वस्त धान्य ग्राहकांचे एक महिन्याचे राशन प्रशासकीय घोळात अडकल्याने शेकडो गोरगरीब कुटुंबांच्या ताटातील हक्काचा घास हिरावला गेला आहे.

स्थानिक सेन्ट्रल कुषक सेवा सहकारी स्वस्त धान्य दुकान, घोडेस्वार सस्त धान्य दुकान, खान स्वस्त धान्य दुकान यांच्या कडे अडगांव बु, सदरपुर, शिवाजी नगर, मालठाणा, गांवचे राशन वाटप केल्या जाते या दुकानदारांना अकोट स्वस्त धान्य पुरवठा विभागाकडुन यावेळेस दि.९/५/२६ रोजी धान्य पुरवठाप्राप्त झाला आणि दि.१५/५/२६ पर्यंतच एप्रिल महिण्याचे राशन वाटप करण्याचे पत्र त्याच दिवशी देण्यात आले केवळ ७ दिवसात ३ थम प्रतिव्यक्ती घेवुन दुकानदारांनी जमेल तेवढे जास्तीत कार्ड काढण्याचे प्रयत्न केले परंतु वेळ संपल्यानंतर ई पाँश मशीन बंद झाली त्यामुळे तीन ही दुकान मिळुन जवळपास ७०० शिधापत्रिकाधारक एप्रिल महिन्याच्या धान्यापासून पूर्णपणे वंचित राहिले आहेत. दि.१६ मे नंतर तिन महिन्याचे हक्काचे धान्य घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांना केवळ मे,व जुन दोन महिण्याचेच धान्य मिळत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

स्वस्त धान्य दुकानदारांनी उर्वरित लाभार्थ्यांसाठी एप्रिल महिन्याच्या कोट्याला मुदतवाढ देण्यात यावी, अशी रीतसर मागणी प्रशासनाकडे केली होती. मात्र, ती अमान्य करण्यात आल्याने या वंचित कुटुंबांच्या घरात आता चिंतेचे वातावरण निर्माण होवुन प्रशासना प्रती रोष व्यक्त केला जात आहे.

या संपूर्ण झालेल्या घोळात स्वस्त धान्य ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त होत आहे. 'आगाऊ धान्य मिळणार' या आशेवर असलेल्या गरिबांना आता प्रशासकीय घोळामुळे एका महिन्याच्या धान्याला मुकावे लागत आहे. यात नेमकी चुकी वेळेत पुरवठा न करणाऱ्या विभागाची की स्थानिक स्वस्त धान्य दुकानदारांची? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. चूक कोणाचीही असो, पण याचे थेट नुकसान मात्र रोज कमावून खाणाऱ्या गोरगरीब जनतेला सहन करावे लागत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. ७ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला बस स्थानकाची दुरवस्था




प्रतिनिधी ७ जून

**अकोला :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अकोला येथील कारभाराचा पुरता बोजवारा उडाला आहे. अकोला आगार क्रमांक १ आणि २ च्या परिसरात प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने की काय, अशी शंका यावी इतक्या मोठ्या प्रमाणावर अवैध प्रवासी वाहतूक फोफावली आहे. याचा थेट फटका एसटी महामंडळाच्या उत्पन्नाला बसत असून महामंडळ तोट्यात जात असताना, येथील विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापक मात्र मूठ गिळून गप्प असल्याचा आरोप प्रवासी आणि नागरिकांमधून केला जात आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा सोमवारी अकोला दौरा आहे. त्यांनी या सर्व गोष्टींची चौकशी आर टी ओ, एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे करण्याची गरज प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.



▶▶ 'रापम' प्रशासनाच्या डोळ्यादेखत अवैध वाहतुकीचा सुळसुळाट!
▶▶ विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांचे अक्षम्य दुर्लक्ष



### अस्वच्छतेचे साम्राज्य; पिण्याच्या पाण्यासाठी प्रवाशांची ओरड

◆ केवळ अवैध वाहतूकच नव्हे, तर अकोला बस स्थानक परिसरातील सोयी-सुविधांची अवस्थाही अत्यंत दयनीय झाली आहे. बस स्थानक परिसरात नियमित स्वच्छता केली जात नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. शासनाने बस स्थानकांवरील स्वच्छतागृहे 'मोफत' केली असली, तरी अकोल्यात मात्र हे मोफत स्वच्छतागृह केवळ नावालाच उरले आहे. तेथील दुर्गंधीमुळे प्रवाशांना उभे राहणेही असह्य झाले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, एवढ्या मोठ्या बस स्थानकावर प्रवाशांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नाही. कडक उन्हात आणि प्रवासादरम्यान प्रवाशांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून, नाईलाजाने महागडे बाटलीबंद पाणी विकत घ्यावे लागत आहे.

### लोकप्रतिनिधीच्या 'लाडामुळे' स्वच्छतेसाठी 'जीएमसी'चा स्टाफ

◆ अकोला बस स्थानकाच्या या दुरवस्थेमागे एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. बस स्थानकाच्या स्वच्छतेचे कंत्राट नेमके कोणाकडे आहे, हा संशोधनाचा विषय असताना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा स्टाफ बस स्थानकात स्वच्छतेच्या सेवेसाठी वापरला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एका बड्या स्थानिक लोकप्रतिनिधीच्या मर्जीतील व्यक्तीला वाचवण्यासाठी आणि त्यांचे 'लाड' पुरवण्यासाठी हा सारा शासकीय यंत्रणेचा गैरवापर सुरू असल्याची चर्चा परिसरात आहे. या राजकीय वरदहस्तामुळेच अधिकारी देखील कोणतीही कारवाई करण्यास धजावत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. मात्र, लोकप्रतिनिधीच्या या लाडामुळे आणि अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे अकोल्यातील सर्वसामान्य जनता आणि प्रवासी मात्र नाहक वेठीला धरले जात आहेत.

### टॉवर चौकातून एसटीच्या हक्काचा महसूल चोरीला

मिळालेल्या माहितीनुसार, आगार क्रमांक २ च्या लगतच आणि टॉवर चौकातील आगार क्रमांक १ च्या अगदी समोरून राजरोसपणे खाजगी वाहनांची अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे. एसटी डेपोच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहनांना उभे राहण्यास बंदी असतानाही, येथे खाजगी मॅक्सी कॅब आणि ट्रॅव्हल्स चालक उघडपणे प्रवासी पळवत आहेत. एसटीच्या हक्काच्या प्रवाशांची पळवापळवी सुरू असल्याने महामंडळाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या प्रकाराकडे शहर वाहतुक शाखा, आर टी ओ आणि बस स्थानकाच्या आगार व्यवस्थापक आणि विभाग नियंत्रक जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याने, या अवैध वाहतुकीला प्रशासनाचा छुपा पाठिंबा आहे का ? असा सवाल आता उपस्थित होत आहे.




# यंदाही शिक्षण महागच, शैक्षणिक साहित्याच्या दरात पाच टक्क्यांनी वाढ


प्रतिनिधी ७ जून

◆ काही जिल्ह्यात १५ जून पासून सुरू होतील शाळा



**अकोला :** जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा व अनुदानित शाळांमध्ये दिनांक विद्यार्थ्यांचा किलबिलाट केव्हा सुरू होणार याची अद्याप तारीख जाहीर झालेली नाही. राज्यातील काही जिल्ह्यात १५ जून पासून शाळा सुरू होणार आहेत. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी बालगोपालांचे जोरदार स्वागत शाळांकडून केले जाणार आहे. यासाठी शासनाकडून विशेष उपाय योजना राबविली जाते. नवीन शैक्षणिक वर्ष सीबीएससी शाळांचे सुरू झाले आहे. आणि बाजारपेठेत शालेय साहित्य खरेदीची मोठी लगबग सुरू आहे. वहया, पुस्तके, दप्तर, आणि गणवेश खरेदीसाठी पालकांची दुकानांमध्ये गर्दी दिसून येत आहे. तथापि गतवर्षीच्या तुलनेत यंदा शालेय साहित्याच्या दरात पाच टक्क्यांनी वाढ झाल्यामुळे पालकांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. यंदा पालकांच्या खिशाला मोठी झळ बसत असून केवळ पहिले ते चौथीपर्यंतच्या मुलांच्या शैक्षणिक साहित्यासाठीच किमान दहा ते बारा हजारापर्यंत खर्च येत आहे.

गेल्या काही वर्षांपासून शैक्षणिक साहित्याच्या खरेदी विक्रीतील मोठा नफा पाहुन काही खाजगी शाळा स्वतःच पाठ्यपुस्तके पालकांना वितरित करून त्यातून निव्वळ नफा कमवत आहेत. बाजारभावा पेक्षा अधिक दर असल्याने एका विद्यार्थ्याच्या केवळ नोटबुक, पुस्तके, इतर साहित्य आणि गणवेशासाठी पालकांना किमान १२ ते १७ हजार रुपये मोजावे लागत आहेत. जूनच्या एक तारखेपासून सीबीएसईच्या शाळा सुरू झाल्यामुळे गणवेश खरेदीसाठी पालकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.



### ड्रेस कोड मुळे पालकांचे बजेट कोलमडणार

◆ नियमित युनिफॉर्म, स्पोर्ट्स युनिफॉर्म आहे. त्यातच काळे बूट, पायमोजे आहेतच. एकूणच युनिफॉर्म आणि बूट खरेदी साठी तीन हजार रुपये खर्च येत आहे

### बालभारतीची पुस्तके माफक दरात

शासकीय किंवा अनुदानित शाळांमध्ये बालभारतीची पुस्तके अत्यंत माफक दरात मिळतात. इंग्रजी शाळांमध्ये खाजगी प्रकाशकांची पुस्तके सक्तीची केली जातात. केवळ स्मार्ट लर्निंग या नावाखाली या पुस्तकांच्या किमती जास्त असतात. पहिली ते चौथीच्या सेटची किंमत तीन ते चार हजाराच्या घरात आहे. मुलांच्या शाळेतील साहित्याचा प्राथमिक खर्चही दहा ते बारा हजारापर्यंत जात असल्याने पालकांना याचा भार सहन होत नाही. शैक्षणिक वर्ष जसे जसे पुढे जाईल तसा हा खर्च आणखी वाढत जातो. पुस्तके पेन आणि दप्तरांच्या किमतीमध्ये थेट १० टक्क्यांनी वाढ झाल्याने सामान्य आणि मध्यमवर्गीय पालकांचे कंबरडे मोडले जाणार आहे.

# पहिल्या नगराध्यक्षांचा नगरपालिकेला विसर? फोटो आणि नावालाही स्थान नाही

प्रतिनिधी ७ जून

**तेल्हारा:** नगरपालिकेच्या इतिहासात प्रथम नगराध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळणारे स्व. रामराव शामराव पाटील यांनी नगर विकासासाठी मोलाचे योगदान दिले होते. सन १९५२ मध्ये नगर परिषद स्थापन झाल्यानंतर त्यांनी पहिले नगराध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारत शहराच्या विकासाचा पाया रचला.

मात्र, आज नगरपालिकेच्या कार्यालयात किंवा अधिकृत नोंदींमध्ये पहिल्या नगराध्यक्षांचा फोटो, नाव किंवा त्यांच्या कार्याचा उल्लेख दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहराच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या व्यक्तीला विसरणे ही खेदाची बाब असल्याचे मत ज्येष्ठ नागरिक व्यक्त करीत आहेत.

इतिहास जपणे ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी असते. त्यामुळे नगरपालिकेने पहिल्या नगराध्यक्ष स्व. रामराव शामराव पाटील यांचा फोटो व माहिती नगरपालिकेत दर्शनी ठिकाणी लावून त्यांच्या कार्याचा सन्मान करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. 'ज्यांनी नगर विकासाचा पाया रचला, त्यांचे स्मरण आणि सन्मान होणे हीच खरी कृतज्ञता.'

# वारंवार इंधन भरणाऱ्या संशयास्पद वाहनांवर होईल कारवाई

प्रतिनिधी ७ जून



**अकोला :** पेट्रोल आणि डिझेलचा साठा आणि काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध राज्य सरकारने अधिक कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यामुळे इंधन भरण्याचे ड्रम आणि टाक्या, तसेच संशयास्पद वाहनांवर कारवाई करणे शक्य होईल. सरकारच्या मते, १ मे ते ३१ मे दरम्यान पेट्रोलच्या मागणीत १८.५४ टक्के आणि डिझेलच्या मागणीत २२.३ टक्के वाढ झाली आहे. किरकोळ ग्राहकांसाठी असलेल्या पेट्रोलियम उत्पादनांची चोरी, किरकोळ विक्री केंद्रांवर पेट्रोलियम उत्पादनांची अवैध विक्री आणि इतर कारणांमुळे ही वाढ झाली आहे.

### वारंवार इंधन भरण्यावर बंदी, संशयास्पद वाहनांवर कारवाई

◆ टँकर आणि बाऊझरमध्ये अवैधपणे इंधन भरणे, पेट्रोलियम उत्पादनांमध्ये भेसळ, गळती, अनधिकृत हस्तांतरण आणि जास्त दर आकारणे यांमध्ये सामील असलेल्यांवर कारवाई केली जाईल.

# अमरावतीत 5 ते 14 जून दरम्यान 'समाज कल्याण सप्ताह'

प्रतिनिधी ७ जून




**अमरावती :** असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया च्या वतीने अमरावती जिल्ह्यात ५ जून ते १४ जून २०२६ दरम्यान 'समाज कल्याण सप्ताह' चे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अमरावतीतील सर्व सर्जन्स एकत्र येऊन विविध समाजोपयोगी उपक्रम राबवणार आहेत. या उपक्रमाची जबाबदारी असोसिएशन सर्जन्स अमरावती यांनी घेतली असून, एच्चे कार्यकारिणी सदस्य डॉ. राजेंद्र गणेरीवाल, अध्यक्ष डॉ. मुरलीधर बूब, सचिव डॉ. कौस्तुभ सारडा आणि संयोजक डॉ. जयश्री इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडणार आहे. डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज व पीडीएमएमसी येथे वृक्षारोपण झाले. ७ जूनला होमगार्ड ऑफिस येथे 'मुलभूत जीवन आधार' प्रशिक्षण, सकाळी ७ ते ९. IMA हॉल येथे ज्येष्ठ सर्जन्सचा सत्कार, सायं. ७ ते १०, ८ जून घ्र्ईं हॉल येथे नर्सेस ट्रेनिंग कार्यक्रम, सकाळी १० ते १२, ९ रोजी शिव टेकडी येथे 'वॉकेथॉन', सकाळी ७ ते ८.३०, १०-१४ जून स्तन कॅन्सर जागरूकता अभियान, रक्तदान शिबिरे, आशा वर्कर्स प्रशिक्षण. रक्तदान शिबिरे पीडीएमएमसी, सृजन कॅन्सर हॉस्पिटल, खोना हॉस्पिटल, पोरे हॉस्पिटल येथे होईल. १० ते २१ जून IMA हॉल येथे 'योगा फॉर डॉक्टर्स', सकाळी ७ ते ८.३० या दरम्यान शहरातील नामवंत सर्जन्स गरीब रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करणार आहेत. डॉ. ओ.जी. मुंदडा यांच्या धन्वंतरी सहकारी हॉस्पिटलच्या निर्देशनाखाली हा उपक्रम राबवला जाईल. स्तन कॅन्सरवर डॉ. जयश्री इंगोले मार्गदर्शन करणार आहेत. रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ. राजेंद्रसिंग अरोरा, डॉ. अनंत पोरे, डॉ. किशोर बेले, डॉ. कौस्तुभ सारडा व डॉ. संगीता खोना करणार आहेत. वृक्षारोपणाची जबाबदारी डॉ. राजेंद्र गणेरीवाल व डॉ. आशिष डगवार यांच्याकडे आहे. होमगार्ड लोकांना डॉ. राधा सावदेकर ण्ईं व इमर्जन्सी लाइफ सपोर्ट चे प्रशिक्षण देणार आहेत. गाडगे महाराज वृद्धाश्रम, वलगांव येथे १२ जून रोजी सायं. ६ ते ८ अन्नदान होणार आहे. या उपक्रमाला डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज, पीडीएमएमसी, IMA अमरावती, आरोग्य भारती, रामयोगी मठ यांचे सहकार्य लाभले आहे. या संदर्भात पत्रकार भवनात माहिती दिली.

# अकोल्यात मनपा प्रशासनाचे लाळघोटेपणाचे 'षडयंत्र'

■ लोकप्रतिनिधींच्या दावणीला बांधले नियम ■ अनधिकृत शाळा पाडण्यास पुन्हा टाळाटाळ!

प्रतिनिधी ७ जून

**अकोला :** न्यायालयाचे स्पष्ट आदेश... मनपा दक्षिण झोनच्या सहाय्यक आयुक्तांची स्वाक्षरी असलेला अंतिम हुकूम... आणि विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणारे ३२४ चौ.मी.चे अवाढव्य अनधिकृत बांधकाम ! सर्व काही समोर असतानाही अकोला महानगरपालिका प्रशासन मात्र एखाद्या लाचार बाहुल्यासारखे मूक गिळून गप्प बसले आहे. २ मे रोजी शैक्षणिक सत्र संपल्यानंतर हे अवैध बांधकाम तात्काळ भुईसपाट करणे गरजेचे होते. २४ तासांची नोटीस बजावून मनपाची फौज सज्ज झाली खरी, पण ऐनवेळी 'वरच्या' दबावापुढे प्रशासनाने नांगी टाकली. हा दबाव महापालिका पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांचा असल्याची माहिती समोर आली आहे. हरिश अश्विन कॉलनी सहकार नगर येथील एस आर पाटील महाविद्यालयाच्या अनधिकृत बांधकाम पाडण्यास कोणी विरोध केला याचा लवकर आम्ही पर्दाफाश करणार आहोत.

४ जून रोजी खदान पोलिस स्टेशनला अधीक्षकांचा दौरा असल्याने बंदोबस्त मिळाला नाही, हे पोकळ आणि हस्यास्पद कारण पुढे करून कारवाई पुन्हा एकदा गुंडाळण्यात आली. तत्पुर्वी मनपा प्रशासनाने वर्ध्याच्या सोमकुवर कंत्राटदाराला ही इमारत पाडण्यासाठी आदेशीत केले होते. या टाळाटाळीमागे दक्षिण झोनमधील मनपाच्या काही सत्तापिपासू पदाधिकाऱ्यांचा आणि त्यांच्या नातेवाईकांचा थेट वरदहस्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. आपल्या राजकीय आणि वैयक्तिक स्वार्थासाठी १३०० विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या पांढरपेशा गुंडांना वाचवण्यासाठी मनपा आयुक्त आणि त्यांचे अधिकारी इतके का धडपडत आहेत ?. असा ही प्रश्न विचारला जात आहे. विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेला केवळ अकोला नगर परिषदेने १४१ चौ.मी.बांधकाम मंजुरी दिली होती. पण, त्यांनी मंजुरीपेक्षा ३२४ चौ.मी.एवढे अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम केल्याचे महापालिकेने सिध्द केले आहे.भुखंडावर रहिवासी भागासाठी असलेले आरक्षणात शाळा उभारण्यात आली. पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापुर्वी हे बांधकाम पाडावे असा आदेश झोन अधिकाऱ्यांनी दिला होता. तो पाळण्यात आला नाही. पुढील शैक्षणिक वर्षे सुरु होण्यापर्यंत महापालिका टाईमपास करणार आहे.

विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थे शहरात इतरत्र भुखंड व शैक्षणिक सोय असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांनी हे अतिक्रमण निष्कासित करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडे केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पण, सत्तारुढ पदाधिकाऱ्याच्या नातेवाईकांनी यात आडकाठी आणल्याची माहिती आहे.

# देवस्थान इनाम कायदा स्थगित केल्याबद्दल महसूलमंत्र्यांचे आभार !

प्रतिनिधी ७ जून

**महाराष्ट्र मंदिर महासंघ, अष्टविनायक मंदिरे, विश्व हिंदु परिषद व मंदिर विश्वस्त यांच्या लढ्याला मोठे यश !**

**अकोला :** राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूर येथे 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप २०२६' हा प्रस्तावित कायदा स्थगित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. या मंदिरहितैषी निर्णयाचे स्वागत तसेच महसूल मंत्र्यांचे आभार मानले आहे.

या कायद्याच्या संदर्भात मंदिर विश्वस्तांच्या बाजूने राज्यभर मंदिर विश्वस्त बैठकीत अभ्यासपूर्ण विषय मांडून, पत्रकार परिषदा, देवस्थान भूमी संरक्षण परिषदा घेऊन शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास दिशा देणाऱ्या 'महाराष्ट्र मंदिर महासंघ', 'अष्टविनायक मंदिर समिती', 'विश्व हिंदू परिषद' आणि राज्यभरातील समस्त मंदिर विश्वस्तांचे आम्ही अभिनंदन करतो. हा निर्णय म्हणजे सर्व मंदिर विश्वस्त आणि समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या संघटित लढ्याला आणि प्रयत्नांना आलेले मोठे यश आहे, असे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे संघटक सुनील घनवट यांनी म्हटले आहे.

महसूलमंत्र्यांनी मांडलेल्या सूत्रांवर मंदिर महासंघाची भूमिका मांडताना सुनील घनवट म्हणाले की, देवस्थानच्या इनाम जमिनी पुन्हा मंदिरांना परत मिळवून देणे, वक्फ बोर्डाप्रमाणे सरकारकडून तेथील अतिक्रमणे काढून देणे, न्यायालयीन लढ्यासाठी नामांकित वकिलांचा सल्ला घेणे, आणि १००-२०० वर्षांच्या जुन्या वहिवाटींबाबत मंदिरांचे नुकसान न होऊ देता जवळपासच्या परिसरात 'समान मूल्याचा' भूखंड मंदिराला देण्याची बंधनकारक तरतूद करणे, हे महसूलमंत्र्यांचे निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि मंदिर हिताचे आहेत. यासोबतच १५ ऑगस्टपर्यंतच्या सुनावणी प्रक्रियेसाठी स्थापन होणाऱ्या अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या १५ सदस्यीय समितीत देवस्थान प्रतिनिधींना स्थान देण्याच्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. ७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## चक्रीवादळाने पुन्हा केळीचे नुकसान

**जामोद :** परिसरात १ जून रोजी सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान विजांच्या कडकडाटासह जोराच्या चक्रीवादळाने शेतकऱ्यांचे शेतातील केळी, संत्रा पिकासह, इतरही फळबाग पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने परिसरातील शेतकरी संकटात असतांना पुन्हा ६ जून रोजी सुद्धा दुपारी ३.३० वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या जोराच्या वादळी वाऱ्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या फळबाग पिकांचे अतोनात नुकसान झाले असून केळी पिक हे पूर्णता भुईसपाट झाल्याने शेतकरी वर्ग मोठा हवालदिल झाला आहे. तरी शासनाने शेतकऱ्यांचा नुकसानीचे त्वरीत पंचनामे पुर्ण करून शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ मदत जमा करावी अशी मागणी जामोदसह जिल्ह्यातील शेतकरी करीत आहेत.

# अवकाळी तडाख्याने शेतकरी उद्ध्वस्त

प्रतिनिधी ७ जून

## ◆ जळगाव जामोदमध्ये केळी-संत्रा बागांचे कोट्यवधींचे नुकसान

**जळगाव जामोद:** बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने प्रचंड कहर केला असून, शेकडो एकरांवरील केळी व संत्रा बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. काढणीच्या उंबरठ्यावर आलेली केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, वर्षभराच्या कष्टांवर अक्षरशः पाणी फिरले आहे.



१ जून रोजी सायंकाळी जळगाव जामोद व लगतच्या संग्रामपूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. या अवकाळी संकटाचा सर्वाधिक फटका केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसला. सुनगाव, जामोद, निवाणा, पळशी झाशी, टुनकी, शेतखेडा, करमोडा, धामणगाव गोतमारे तसेच जळगाव परिसरातील शेकडो एकरांवरील केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या. काढणीसाठी तयार असलेली पिके काही क्षणांत आडवी झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत. केळीबरोबरच संत्रा बागांनाही मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी फळगळ होऊन झाडांचे नुकसान झाले असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त भागाची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, पक्ष प्रवक्त्या अॅड. जयश्री शेळके यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली.

जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर तसेच अॅड. जयश्रीताई शेळके यांनी महावितरण कार्यालय, संग्रामपूर येथे भेट देऊन मागील तीन ते चार दिवसांपासून खंडित असलेला वीजपुरवठा तात्काळ पूर्ववत करावा, अशी मागणी केली. यासोबतच शेतकऱ्यांना नियमित किमान आठ तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबतही उपकार्यकारी अभियंता आशिष गणगणे यांना विनंती करण्यात आली.

याच अनुषंगाने संग्रामपूरचे तहसीलदार प्रशांत पाटील यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये नाफेड अंतर्गत बंद असलेली ज्वारी खरेदी पुन्हा सुरू करावी, तसेच अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या केळी व संत्रा बागांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांनीही शासनाकडे तातडीने मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे. ठकाही मिनिटांच्या वादळी वाऱ्याने वर्षभराची मेहनत मातीमोल झाली. आता शासनाच्या मदतीशिवाय पर्याय नाही,ठ अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख गजानन वाघ, सहसंपर्कप्रमुख दत्ताभाऊ पाटील, उपजिल्हाप्रमुख तुकाराम काळपांडे, युवासेना जिल्हाप्रमुख शुभम पाटील, युवासेना उपजिल्हाप्रमुख विशाल पाटील, विधानसभा अध्यक्ष भिमराव पाटील, रवी झाडोकार (तालुका प्रमुख, संग्रामपूर), शहरप्रमुख रमेश काळे, उपतालुकाप्रमुख विजय मारोडे, अजय घिवे (युवा विधानसभा संघटक), विभाग प्रमुख राजू पाटील, सरपंच राहुल मेटांगे (पळशी झाशी), राजू सुसर (माजी उपसरपंच, शिरपूर), सोशल मीडिया प्रमुख गोपाल पाटील, मनोज वाघ, अतुल बांगर, सोहम मारोडे व जय मेटांगे उपस्थित होते.

## नांदुरा तालुक्यात हातभट्टी दारूविरोधात पोलिसांची धडक कारवाई

### ◆ दोन ठिकाणी छापे; सुमारे १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदुरा :** नांदुरा पोलिसांनी हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात विशेष मोहीम राबवत तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडक कारवाई केली. या कारवाईत हातभट्टी दारू, मोह सडवा व दारू गाळण्याचे साहित्य असा एकूण सुमारे १७ हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पहिली कारवाई टाकळी वतपाळ शिवारातील जिगाव धरणाच्या भिंतीजवळ करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकला असता ६० लिटर गुळमिश्रित मोह सडवा, १० लिटर हातभट्टी दारू, २० लिटर उकळता मोह सडवा तसेच दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य मिळून सुमारे ९ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. दुसरी कारवाई ग्राम वाडी येथील शेतातील टिनपत्र्याच्या खोपटामध्ये करण्यात आली. या ठिकाणी ६० लिटर गुळमिश्रित मोह सडवा, ४ लिटर हातभट्टी दारू, १० लिटर उकळता मोह सडवा तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ७ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क), (फ) व (ड) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास नांदुरा पोलीस करीत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध हातभट्टी दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# खामगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची दमदार कामगिरी

प्रतिनिधी ७ जून

## २३,६३० वाहनांची नोंदणी, ५७ कोटींचा विक्रमी महसूल

**खामगाव:** खामगाव येथे नव्याने सुरू झालेल्या एमएच-५६ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शासनाच्या तिजोरीत तब्बल ५७कोटी रुपयांचा विक्रमी महसूल जमा केला आहे. विशेष म्हणजे कार्यालय सुरू झाल्यानंतर अवघ्या वर्षभरातच २० कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत जवळपास तिप्पट महसूल वसूल करण्यात यश आले आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील घाटाखालील खामगाव, शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद, नांदुरा आणि मलकापूर या सहा तालुक्यांतील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाने आणि इतर कामांसाठी पूर्वी बुलडाणा येथे जावे लागत होते.



नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी ७ मे २०२५ रोजी खामगाव येथे एमएच-५६ उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात आले. कार्यालय सुरू झाल्यानंतर वर्षभरात २३,६३० वाहनांची नोंदणी करण्यात आली. यामध्ये १५,६६५ दुचाकी, १,९६१ ट्रॅक्टर, १,५०० मोटार कार व जीप, ३१६ चारचाकी मालवाहू वाहने, २१९ रिक्षा तसेच इतर विविध वाहनांचा समावेश आहे. वाहतूक सुरक्षिततेसाठी आरटीओकडून शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती अभियानही राबविण्यात येत आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेसाठी स मलकापूर व संग्रामपूर येथे महिन्यातून दोनदा, तर जळगाव जामोद येथे महिन्यातून एकदा शिबिरांद्वारे सेवा दिली जाते. सध्या कार्यालय स नगर परिषदेच्या कॉम्प्लेक्समध्ये भाडेतत्त्वावर सुरू असून वाहन चाचणीसाठी स्वतंत्र ट्रॅक व जागेचा अभाव आहे. यासाठी १० एकर जागेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमंत खराबे यांनी दिली.

# खाद्य पदार्थांच्या पॅकिंगसाठी वृत्तपत्राचा कागद वापरण्यास मनाई !

प्रतिनिधी ७ जून

## एफएसएसएआयचे स्पष्ट निर्देश !!

**नांदुरा :** मुंबईतील काही प्रसिद्ध वडापाव विक्रेत्यांवर नुकत्याच झालेल्या संयुक्त कारवाईनंतर अन्न सुरक्षा प्रशासनाने खाद्यपदार्थांच्या पॅकिंगबाबत महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत.

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) खाद्यपदार्थ गुंडाळण्यासाठी किंवा पॅकिंगसाठी वृत्तपत्रांचा वापर तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, वृत्तपत्रांच्या छपाईसाठी वापरण्यात येणाऱ्या शाईमध्ये विविध प्रकारची रासायनिक द्रव्ये, रंगद्रव्ये, बाइंडर्स तसेच शिसेसारख्या जड धातूंचा समावेश असतो. हे घटक अन्नपदार्थांच्या संपर्कात आल्यास त्यांचे अंश अन्नामध्ये मिसळू शकतात. त्यामुळे आरोग्यावर गंभीर आणि दीर्घकालीन दुष्परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय, वृत्तपत्रांचे वितरण, वाहतूक आणि हाताळणीदरम्यान त्यावर धूळ, घाण तसेच विविध प्रकारचे सूक्ष्मजंतू जमा होऊ शकतात. अशा अस्वच्छ कागदाचा वापर अन्नपदार्थांसाठी केल्यास अन्नजन्य आजारांचा धोका वाढू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

एफएसएसएआयने सर्व खाद्यपदार्थ विक्रेते, हॉटेल्स, रेस्टॉरंट, फास्ट फूड केंद्रे आणि खाद्यपदार्थांची हातगाडी स्टॉल धारकांना अन्नसुरक्षा नियमांचे पालन करून सुरक्षित व मान्यताप्राप्त पॅकिंग साहित्याचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः वडापाव, भजी, समोसे, कचोरी, आलुवडा आणि इतर खाद्यपदार्थांसाठी वृत्तपत्राऐवजी अन्नसुरक्षित कागद किंवा पॅकेजिंग साहित्य वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड होऊ नये, यासाठी या निर्देशांची कठोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# इंग्रजकालीन पूल आता वाहतुकीसाठी बंद!

प्रतिनिधी ७जून

## पुलाचा पिलर मध्यभागी तुटल्याने धोका वाढला!

**खामगाव :** शहरातील शर्मा टर्निंग परिसरातील इंग्रजकालीन जुना पूल मोडकळीस आल्याने प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने या पुलावरील वाहतूक तातडीने बंद केली आहे. पुलाच्या मध्यभागी असलेला आधारस्तंभ (पिलर) तुटल्याचे तसेच खालच्या भागात मोठे तडे गेल्याचे निदर्शनास आल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे.



प्राप्त माहितीनुसार, पुलाची संरचना मोठ्या प्रमाणात कमकुवत झाली असून त्यावरून वाहतूक सुरू राहिल्यास अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करत पुलाच्या दोन्ही बाजूंना बॅरिकेड्स उभारून वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. पुलावरील वाहतूक बंद झाल्याने या मार्गाचा वापर करणाऱ्या वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. सध्या या मार्गावरील वाहतूक नगरपालिकेसमोरील रस्त्याने वळविण्यात आली असून, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. हा पूल इंग्रजकालीन असल्याचे सांगितले जाते.

अनेक वर्षापासून या पुलावरून वाहतूक सुरू होती; मात्र कालांतराने पुलाची अवस्था खालावत गेल्याने त्याच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अखेर पुलाची संरचना धोकादायक झाल्याचे आढळून आल्यानंतर प्रशासनाने तातडीने वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, पुलाची तांत्रिक पाहणी करून त्याच्या दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांना नुकसानीची मदत मिळण्यासाठी सर्व प्रक्रिया गतीने पूर्ण करा- आ. संजय कुटे

प्रतिनिधी ७ जून

**संग्रामपूर:** संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेले पंचनामे व उपाययोजनांचा ६ जून रोजी आढावा घेवून प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार लवकरात लवकर आर्थिक मदत मिळावी यासाठी सर्व प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश आ.डॉ. संजय कुटे यांनी प्रशासनाला दिले आहेत.

१ जून रोजी सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे जळगाव जामोद मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या केळी, संत्रा व इतर फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अनपेक्षित नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, घटनेनंतर तात्काळ संबंधित यंत्रणेला पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याशी सातत्याने



संपर्क साधून नुकसानीचा आढावा घेतला असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांअंतर्गत तातडीने मदत मिळावी यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच विमाधारक शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाई संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या आठवडाभरात नुकसान अहवाल तयार करून तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, विमाधारक शेतकऱ्यांनीही आपल्या नुकसानीची तक्रार संबंधित यंत्रणेकडे त्वरित नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार संघातील प्रत्येक शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय व योग्य मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही यावेळी आ. कुटे यांनी दिली.

# बसस्थानक परिसरात २०० मीटर अवैध पार्किंग झोनची अंमलबजावणी

प्रतिनिधी ७जून

## ◆ आठ वाहनांवर दंडात्मक कारवाई

**खामगाव :** खामगाव शहरातील बसस्थानक परिसरात वाहतूक शिस्त राखण्यासाठी आणि प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी महामंडळाने २०० मीटर अवैध पार्किंग झोनची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे सुरू केली आहे. या अंतर्गत आज, ६ जून रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास बसस्थानक परिसरात विशेष कारवाई मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करून उभी करण्यात आलेली वाहने तपासण्यात आली.



एसटी महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बसस्थानक परिसरात पाहणी करून अवैधरित्या पार्किंग केलेल्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत एकूण आठ वाहनांना दंड ठोठावण्यात आला. बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये तसेच बसच्या आवागमनात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी ही मोहीम राबविण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. कारवाईवेळी एसटी महामंडळाचे सुरक्षा च दक्षता अधिकारी जुनारे, वाहतूक निरीक्षक मोहिनी पाटील तसेच आगार व्यवस्थापक सचिन बारडेकर उपस्थित होते. याशिवाय वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी रफिक शहा, राहुल इंगळे आणि दीपक सपकाळ यांनीही मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. अधिकाऱ्यांनी वाहनचालकांना बसस्थानक परिसरातील २०० मीटर हद्दीत बाहने उभी न करण्याचे आवाहन केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर भविष्यातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

या कारवाईमुळे बसस्थानक परिसरातील वाहतुकीला शिस्त लागण्यास मदत होणार असून प्रवाशांच्या सुरक्षिततेतही वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. एसटी प्रशासनाने नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# अनुदानावर बियाणे वाटपबाबत संभ्रम

प्रतिनिधी ७ जून

**सोनाळा :** कृषी विभागाने मोफत सोयाबीन बियाणे वाटपात महाडीबीटीच्या लॉटरीत चक्क १०० टक्के महिला शेतकऱ्यांना लाभासाठी पात्र ठरविल्याचे समोर आले आहे. बियाणे मिळण्यासाठी सर्व पुरुष शेतकरी अर्ज बाद केले असून त्या पुरुष शेतकरयांना घरची वाट दाखविण्यात आली आहे. त्यामुळे भिक नको पण नियम आवर असा संताप कृषी विभागा विरुद्ध सर्व शेतकरी व्यक्त करित आहेत.

**महिलांना १० टक्के आरक्षणाची लॉटरी**

कृषी विभागाची पुरुष शेतकऱ्यांना घरची वाट येतो. यंदा मात्र सर्वच बाबीला फाटा देत कृषी विभागाने पुरुष शेतकऱ्यांना ठेंगा दाखवून महिला शेतकरी मोफत बियाणे लाभार्थी यादी प्रसिद्ध केली आहे. हे महिला वंदन असून देवा भाऊ यांच्या सरकारचा हा अजब गजब निर्णय असल्याचा सूर शेतकरी व्यक्त करित आहेत. याबाबत तालुका कृषी अधिकारी रमेश जाधव यांचेशी संपर्क साधला असता ते उपलब्ध झाले नाही.

बियाणे वाटपाची लॉटरी पुणे येथून लागत असल्याने तालुका जिल्हा पातळीवर च्या अधिकाऱ्यांच्या हाती काहीच नाही. असे कृषी विभागाचे कर्मचारी सांगत आहे. शंभर टक्के महिलांना बियाणे वाटपाची महाडीबीटीची लॉटरी वादात सापडली आहे.

महाडीबीटी पोर्टल वर संग्रामपूर तालुक्यातील १३५६ शेतकऱ्यांनी मोफत सोयाबीन मिळण्यासाठी अर्ज केले होते. २०० जणांच्या लक्षांकानुसार १८८ शेतकऱ्यांची कृषी विभागाने लॉटरी काढली. मात्र १०० टक्के आरक्षण देत १८८ महिला शेतकऱ्यांना मोफत बियाणे साठी पात्र ठरविले. तर अर्ज केलेले ११५६ पुरुष शेतकरी बाद ठरविले. कृषी विभागाने खरिप हंगाम २६ - २७साठी अनुदानावर कडधान्य आत्मनिर्भर प्रमाणीत बियाणे तसेच राष्ट्रीय खाद्य तेल अभियान तेलबिया पिके प्रात्याक्षिक आणि संकरित बियाणे भरड धान्य कार्यक्रम सुरू केला आहे.

प्रथम अर्ज केलेल्यांना महाडीबीटी योजनांचा लाभदेण्याचा नियम आहे. त्यासाठी सोयाबीन तूर, मूंग, उडीद मका वाटप साठी ऑनलाईन अर्जाची कृषी विभागाने छाननी करून लॉटरी काढली. कृषी विभागाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे जात प्रवर्ग निहाय्य नेहमी लॉटरी काढून लाभ देण्यात आला.

# पर्यावरण रक्षणात धर्मक्षेत्राचे मोठे योगदान- जिल्हाधिकारी

प्रतिनिधी ७ जून

**मेहकर :** भारतातील समाजजीवन धर्मकेंद्रांच्या परिघात विकसित झालेले असल्यामुळे धर्मक्षेत्राने पर्यावरण रक्षणासाठी कृतीतून मोठे योगदान दिलेले आहे, असे उद्‌गार बुलढाण्याचे जिल्हाधिकारी प्रवीणकुमार देवरे यांनी काढले. ते ५ जून रोजी येथील संत बाळाभाऊ महाराज पितळे नरसिंह संस्थानद्वारा पर्यावरण दिनानिमित्त आयोजित वृक्षबीज वितरण आणि पर्यावरण स्नेहींचा सन्मान सोहळा या कार्यक्रमात बोलत होते. संस्थानचे गुरुपीठाध्यीश तथा अध्यक्ष सदुरु अॅड. रंगनाथ महाराज पितळे यांनी यावेळी बोलताना जगातील अकरापैकी सहावे असलेल्या नरसिंह मंदिराच्या पायथ्याशी वाहणाऱ्या पैनगंगा नदीच्या शुध्दीकरणाची गरज व्यक्त केली. मंचावर उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, न. पा. चे मुख्याधिकारी रामराजे कापरे, नायब तहसीलदार अजय पिंपरकर, नायब तहसीलदार नितीन बोरकर, पंजाबराव मेटांगळे आदी मान्यवर होते. जिल्हाधिकारी देवरे यांच्या हस्ते पर्यावरण मित्र अशोक अडेलकर, पाचर्णे सर व मोहन पवार यांचा सन्मान करण्यात आला. तर सामाजिक वनीकरण विभागाचेवनरक्षक कैलास सरकटे आणि वनपाल रामेश्वर आदबने यांना वृक्षबीजांचं वितरण करण्यात आलं. संस्थानचे विश्वस्त प्रा. डॉ. श्रीहरी महाराज पितळे यांनी सूत्रसंचालन केलं. सद्गुरु अॅड. रंगनाथ महाराज पितळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी देवरे यांचा शाल व संस्थानची ग्रंथसंपदा देऊन सत्कार करण्यात आला. तर विश्वस्त आशिष उमाळकर यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी जोगी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला विश्वस्त विठ्ठल खंदारकर, ख. वि. सं. चे उपाध्यक्ष मनोज सावजी, विनोद डुरे पाटील, अॅड. राजेश निकम, एकनाथ महाळंकर, कुलदीप उमाळकर, अशोक शिरसाट, कुशल उमाळकर, परमेश्वर गाडेकर, रमेश इंगळे, किशोर मैंद, महेश रोडसमुद्रे आदींची उपस्थिती होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135